# शालेय विद्यार्थ्यांसाठी 'कुतूहल' प्रश्नमंजूषा

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल), भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेमध्ये (आयसर) कार्यरत वैज्ञानिकांच्या 'दी एक्सायटिंग सायन्स ग्रुप'तर्फे (ईएसजी) शालेय विद्यार्थ्यांसाठी 'कुतूहल २०१६' या आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नऊ जानेवारी, २०१६ रोजी 'आयसर'च्या आवारात ही स्पर्धा होणार आहे.

याविषयी 'ईएसजी'तर्फे प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकातील माहितीनुसार, पहिल्यांदाच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन टप्प्यांमध्ये ही स्पर्धा घेतली जाणार आहे. कोणतेही प्रवेश शुल्क नसलेल्या या स्पर्धेसाठी नावनोंदणी आवश्यक आहे. अधिक माहिती http://www.excitingscience.org या वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. नावनोंदणीची अंतिम मुदत २४ डिसेंबर २०१५ असल्याचेही कळवण्यात आले आहे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणाऱ्या 'ईएसजी'ने येत्या १३ आणि १९ डिसेंबरला विज्ञानविषयक व्याख्यानांचेही आयोजन केले आहे. 'प्रेझेंट फिजिक्स- फ्युचर डिव्हाइसेस' या विषयावर १३ डिसेंबरला, तर 'हाऊ ड्रोन्स वर्क, दी सायन्स ऑफ ऑटोमेशन' या विषयावर १९ डिसेंबरला ही व्याख्याने होणार आहेत. ही व्याख्याने सर्वांसाठी खुली असली, तरी त्यासाठी नावनोंदणी आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले.